नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र.३३०**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक १४ याची जबानी</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव - महादेव वसंत घुले,
वय - ६५ वर्षे, व्यवसाय – शेती,
रा. - भालेगाव, ता. मलकापुर जि.बुलडाणा

**<u>सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी. देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....</u>**

०१. माझी शेती भालेगाव येथे असून साडेचार एकर घरची शेती आहे. बाहेरची मी आठ एकर शेती केली होती. सन २०२२-२३ मध्ये अशीच परिस्थीती होती. सन २०२२-२३ मध्ये ५१ क्वींटल कापूस झाला होता. याशिवाय, मी सोयाबीन व मका पेरला होता. तो ५१ क्वींटल कापूस मी जगन नारखेडे याला विकला होता. मी जगन नारखेडे याला ओळखत होतो. ते माझ्या घरासमोर रहायचे. त्यावेळी मारकेटला सीसीआय प्रमाणे ९ हजार प्रती क्वींटल भाव होता व बाहेर साडेसात हजार रूपये प्रति क्वींटल भाव होता. मी जगन नारखेडे याला तो कापूस ९ हजार रुपयांच्या भावाने विकला होता. त्या व्यवहारात अर्धे पैसे एका महिन्याने व उर्वरित रक्कम ४० दिवसांनी देण्याचे ठरले होते. तो कापूस मी त्याला माझ्या घरून मोजमाप करून दिला होता. सर्व कापसाचे ४,५९,०००/- रूपये झाले होते. ते पैसे त्याने दिले नाही. जगनने काटापट्टी मला दिली नाही. पोलीस स्टेशनला गेलो होतो. परंतु माझ्याकडे व्यवहाराच्या अनुषंगाने पुरावा नसल्याने मी त्यांना कुठलेही कागदपत्र दिले नाही. मी जगन नारखेडे याला ओळखतो. तो आज दृकश्राव्य पध्दतीने हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री.एन.सी.जाधव यांचेमार्फत सुरु....</u>**

०२. हे म्हणणे खरे आहे की, कापूस मोजणार हे मापारी लोक असतात. हे म्हणणे खरे आहे की, ते लोक ज्या ज्या कापसाच्या गाठोड्याचे वजन करतात त्याचे वजन एका कागदावर लिहीले जाते. हे म्हणणे खरे आहे की, एकत्रीत मोजलेल्या कापसाच्या गाठोड्याचे वजन केले जाते. हे म्हणणे खरे आहे की, कापूस मोजल्यानंतर एक प्रत व्यापा-याकडे व एक

प्रत शेतक-याला दिली जाते. हे म्हणणे खरे आहे की, मापारी लोक हे व्यापा-यांचे व शेतक-यांचे असे दोघांचेही नसतात. हे म्हणणे खरे आहे की, त्यांची कापूस मोजण्याची स्वतंत्र व्यवस्था आहे. ती व्यापारी व शेतकरी अशी दोघांचीही नसते. माझा कापूस मापा-यांनी मोजला. मी मापा-यांना कापूस मोजल्यानंतर काटापट्टी मागितली होती. मापा-यांनी मला दुस-या दिवशी सकाळी या असे सांगितले. मी त्या मापा-याकडे काटापट्टी घ्यायला गेलो होतो. ते मापारी बाहेर गावचे होते मी त्यांना ओळखत नाही. ते कोणत्या गावचे होते ते मला माहीत नाही. मापा-याचे नाव मला माहीत नाही. मापा-याने मला काटापट्टी दुस-या दिवशी दिली नाही. मी पोलीसांना मापा-याने काटापट्टी दिली नसल्याचे सांगितले नव्हते.

०३. हे म्हणणे खरे नाही की, मापा-याने किंवा मी तो ५१ क्वींटल कापूस मोजलेला नाही व त्यामुळे मी तशी काटापट्टी पोलीसांना दिलेली नाही. मी पोलीसांना बयाण देतेवेळी बाहेरची आठ एकर शेती केली होती असे सांगितले होते. सदर बाब माझ्या जबाबात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे स्वतःची आठ एकर शेती नाही आहे. मी पोलीसांना जबाब देतेवेळी जगन नारखेडे हा माझ्या घराजवळ राहतो असे सांगितले होते. सदर बाब माझ्या बयाणात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितल्याप्रमाणे असा कोणताही कापूस मी जगन नारखेडे याला विकलेला नाही त्यामुळे त्याचे माझ्याकडे ४,५९,०००/- रुपये देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटे बयाण देवून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....</u>**

०४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ ते १४ यांचा सदर व्यवहाराशी कोणताही संबंध नाही तसेच मी त्यांना ओळखत देखील नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्रीमती एन.के.डोसे यांचेमार्फत सुरु....</u>**

०५. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....</u>**

०६. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला..

**उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....**

०७. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.डी.मराठे यांचेमार्फत सुरु....**

०८. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....**

०९. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.११ तर्फे विधीज्ञ श्री.आर.एस. जगताप यांचेमार्फत सुरु....**

१०. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.१२ तर्फे विधीज्ञ श्रीमती आर.डी.संचेती यांचेमार्फत सुरु....**

११. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.०४ तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.शेख यांचेमार्फत सुरु....**

१२. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2025.11.05 17:00:05 +0530

दिनांक : ०५/११/२०२५.

**( पी.एस.ठाकरे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर